# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

### सोमवार, दिनांक ०३ जुलै, २०२३ / आषाढ १२, १९४५ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

७३. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या चतुर्थ सत्रातील एकूण २४७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ४४ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण २०३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ५५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२, क्रमांक ७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता प्रलंबित १४८ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६१ निवेदने गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. एकूण ८७ निवेदनांपैकी ५३ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ५८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. त्यापैकी ३४ निवेदनांपैकी ०६ निवेदने दिनांक १५ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग - २, क्रमांक ६० अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता २८ निवेदनांपैकी ०५ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ०३ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव - १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

**सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.सुरेश भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जळगाव महानगरपालिका विधी समितीच्या स्वीकृत सदस्यपदी सन-२०१७ मध्ये बेकायदेशीर रित्या नियुक्त झालेले व्यापारी श्री.धीरज रामचंद्र सोनी यांचे कुटुंबियांनी मोजे पिंप्राळा गट क्र.१२५ ही बगीचासाठी आरक्षित शेतजमीन खरेदी करणे, त्या जामिनीबाबत मा.उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.६५४२/२०२१ मध्ये दि.११/०८/२०२१ रोजी निकाल देणे, निकालात आरक्षण व्यपगत झाल्याचे, तरीसुद्धा संपादनासाठी १ वर्षांची मुदत वाढ दिल्याचे नमूद असणे, मा.उच्च न्यायालयाच्या मुदतवाढीच्या निर्णयाविरुद्ध जमीन मालक श्री.सोनी यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात स्पे.लिव पिटीशन (सिविल) क्र.१४७०३/२०२१ दाखल करणे, जळगाव महानगरपालिकेने महासभेची मंजुरी न घेता मा.सर्वोच्च न्यायालयात जमीन संपादन करण्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करणे, जळगाव महानगरपालिकेने घाई-घाईने भूसंपादनाची आगाऊ मोबदला रक्कम जमा करणे, जमीन मालक श्री. सोनी यानी संपादनास विरोध न करणे, मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतांना श्री.अतुल मुंदडा यांनी जळगाव महानगरपालिका आयुक्त व प्रधान सचिव नगरविकास विभाग मंत्रालय यांना दि.०४/०४/२०२२ रोजी तक्रार अर्ज देणे, श्री.मुंदडा यांच्या अर्जात लातूर येथील जमिनीबाबतच्या समान प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने सिविल अपील क्र.१९६५/२०२२ मधील निर्णयाचा उल्लेख करून प्रत देणे, लातूर प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने संपादनाची मुदतवाढ चुकीची ठरवून आरक्षण व्यपगत झाल्याचे निर्णय देणे, श्री.मुंदडा यांच्या अर्जाबाबत शासनाने महानगरपालिका आयुक्तांना दि.२४/०५/२०२२ रोजी पत्र देवून अहवाल मागविणे, जळगाव महानगरपालिकेने शासनास अहवाल सादर न करणे तसेच श्री.मुंदडा यांच्या अर्जाची मुद्दाम दखल न घेणे, जमीन मालक श्री.सोनी यांच्या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयात लातूर प्रकरणाचा संदर्भ देण्याचे टाळणे, श्री.मुंदडा यांनी महानगरपालिकेचे महापौर यांना दि.२१/०६/२०२२, १३/०७/२०२२ व २१/१०/२०२२ रोजी अर्ज देणे, त्या अर्जांची योग्य दखल न घेणे, जमीन मालक श्री.सोनी यांना महानगरपालिकेने संपादनापोटी ४.५ कोटी देणे, माजी विधी समिती स्वीकृत सदस्य श्री.सोनी यांनी ३ वर्षांपूर्वी घेतलेल्या जमिनीच्या ५५% आरक्षण मुक्त झालेल्या क्षेत्रात महानगरपालिकेच्या मदतीने ३ कोटी पेक्षा जास्त नफा कमविणे, महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात गुणवत्तेवर युक्तिवाद न करणे, जमीन मालक श्री.सोनी यांचे प्रकरणात महानगरपालीकेच्या खराब आर्थिक परिस्थितीबाबत नमूद न करणे, श्री.सोनी यांची जमीन शहरा पासून लांब झोपडपट्टीच्या पुढे व रेल्वे रुळाला लागून असणे, पिंप्राळा शिवारातीलच बगीचासाठीच आरक्षित असलेल्या जमिनी गट क्र.३४०/१ व ३४०/२ महानगरपालिकेने

मा.उच्च न्यायालयात स्वतःहून सोडून देणे, त्यासाठी महानगरपालिकेच्या खराब आर्थिक परिस्थितीचे कारण देणे, त्या दोन्ही जमिनींचे स्थळ श्री.सोनी यांच्या जमिनीपेक्षा खूपच वस्तीचे असणे, त्या दोन्ही जमिनी सोडल्याच्या फक्त ३ महिन्यानंतर श्री.सोनी यांची जमीन आवश्यक असल्याचे प्रतिज्ञापत्र महानगरपालिकेने दि.१०/११/२०२१ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात सादर करणे, विधी समितीच्या माजी स्वीकृत सदस्य श्री.धीरज सोनी यांच्यासाठी महानगरपालिकेने निधी उधळणे, वर्तमानपत्रात भूसंपादन घोटाळाच्या बातम्या प्रसिद्ध होणे, शहरातील रस्ते तयार करणे सोडून कायद्याने आरक्षण व्यपगत झालेल्या जमिनीचे मुद्दाम संपादन करणे, यामुळे जनतेमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण यामुळे, शासनाने भूसंपादन रद्द करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

जळगांव शहराकरीता शासनाने दि.११.०२.२००२ अन्वये मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मंजुर केलेली असून सदर विकास योजना दि.०७.०४.२००२ पासून अंमलात आहे. तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने दि.१०.०८.२००४ अन्वये मंजुर केलेली असून ती दि.०१.०४.२००४ पासून अंमलात आलेली आहे. सदर विकास योजनेमध्ये पिंप्राळा गट नं.१२५ ही जमिन आरक्षण क्र.११६ बगीचा साठी आरक्षित आहे.

मौजे पिंप्राळा गट नं.१२५ ची जमिन मंजुर विकास योजनेनुसार बगीचासाठी आरक्षित असल्याने तसेच विकास योजना मंजुर होऊन १० वर्ष पेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने जमिन मालक यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या खरेदी सुचनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेने भुसंपादन प्रस्ताव सादर केला होता. उक्त प्रकरणी भूसंपादन खर्चास मान्यतेसाठी महासभे समोर प्रस्ताव सादर केला असता महासभेने खर्चास मान्यता न देता टी.डी.आर घेणे बाबत निर्णय पारित केलेला आहे. भुसंपादन प्रक्रिया पूर्ण करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १६२ नुसार विशेष अधिकार प्रदान करणेसाठी महानगरपालिकेच्या विनंतीनुसार आयुक्त यांची विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. दरम्यानच्या काळात जमिन मालक यांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठ येथे रिट याचिका दाखल केली. मा.उच्च न्यायालयाने भुसंपादनासाठी ०१ वर्षाची मुदत वाढवून दिली. या निर्णया विरुध्द जमिन मालक यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी.दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार व आदेशानुसार भुसंपादनाची पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी विहीत मुदतीत पूर्ण केली.

उपस्थित केलेल्या मुद्यानुसार भुसंपादन प्रकिया पुर्ण करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १६२ नुसार दि.११ /०२ /२०२० अन्वये आयुक्त यांना विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत. त्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. श्री. अतुल मुंदडा यांच्या अर्जात लातुर प्रकरणाचा उल्लेख केलेला असून मा.सर्वोच्च न्यायालयाने भूसंपादनाची मुदतवाढ चुकीची ठरवून आरक्षण व्यपगत झाल्याचे निर्णय दिलेला असल्याचे नमुद आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठात निर्णयाविरोधात जमिन मालकांनी मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान केले असता महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास (defend) केलेले आहे.

श्री.अतुल मुंदडा यांनी दि.०४.०४.२०२२ रोजी दिलेल्या अर्जापुर्वी दि.१०/११/२०२१ व दि.१५/०२/२०२२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात एस. एल. पी. प्रलंबीत असल्याने महानगरपालिकेमार्फत शासनास अहवाल सादर करण्यात आला नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यान्वित भुसंपादन प्रकरणामध्ये भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग जळगाव यांनी दि.०७/१०/२०२२ रोजी घोषित केलेल्या निवाड्यानुसार रक्कम रु.४,०८,१९,५८६/- (चार कोटी आठ लाख एकोणावीस हजार पाचशे शहाऐंशी मात्र) जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात आली आहे. मंजुर विकास योजनेत मौजे पिंप्राळा गट नं.१२५ या जमिनीवर आरक्षण क्र.११६ बागीचा करीता आरक्षित असल्याने त्यानुसार भुसंपादनाची कार्यवाही झालेली आहे.

मोजे पिंप्राळा गट नं. ३४०/१ व ३४०/२ या जमिनीवर आरक्षण क्र.७० व ७१ अनुक्रमे प्राथमिक शाळा व हायस्कुल चे आरक्षण प्रस्तावित आहे. उक्त प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १२७ च्या नोटीसीच्या अनुषंगाने भुसंपादन प्रकरणी रक्कम रु.१४,७९,६०,७५०/- (अक्षरी चौदा कोटी एकोंऐंशी लाख सदुसष्ट हजार सातशे पन्नास मात्र) अपेक्षीत खर्चासह महासभेसमोर प्रस्ताव सादर केला असता त्यास महासभेने महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता आर्थिक मोबदला देणे ऐवजी टी.डी.आर देणेस मान्यता प्रदान केलेली आहे. तथापि जमिन मालक यांनी टी.डी.आर घेण्यास नकार दिला त्यामुळे भुसंपादनाची प्रक्रिया झाली नाही. परंतु पिंप्राळा गट नं.१२५ आ.क्र.१६६ च्या संदर्भात शासनाने आयुक्त यांना विशेष अधिकार प्रदान केलेले असल्याने भुसंपादनाची कार्यवाही झालेली आहे. मंजुर विकास योजना नकाशानुसार मौजे पिंप्राळा गट नं.१२५ आरक्षण क्र.१६६ बगीचा असुन सदर प्रश्नाधिन जमिनीचे, मा.उच्च न्यायालय यांचे निर्णय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय यांचे निर्देश व आदेशानुसार भूसंपादन प्रक्रिया करण्यात आली आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र.१९०१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

श्री.राहुल ढिकले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक शहरात व जिल्हयात मीटर रिडिंग व बिल वाटपाचे कामे गेल्या २० वर्षापासून रुद्रा सिस्टीम एजन्सी करित असणे, सदरील एजन्सी मीटर रिडिंग प्रत्यक्षात न घेता परस्पर चुकीचे रिडिंग नोंद करून ग्राहकांना बिल देवून सर्वसामान्य ग्राहकांना प्रचंड त्रास देत असणे, सदरील एजन्सीच्या चुकीच्या कामामुळे फेब्रुवारी, २०२० ते मार्च, २०२१ पर्यंत १ कोटी ४४ लक्ष रुपये दंड आकारण्यात आलेला असणे, परंतु, सदरील एजन्सीकडून केवळ २२ लाख ३३ हजार ६४० रुपये दंड वसूल करून महावितरणचे मोठया प्रमाणात महसूल बुडवून नुकसान केलेले असणे, मे. रुद्रा सिस्टीम नाशिक यांना नाशिक मंडळ अंतर्गत LT/ PC-0 ग्राहकांचे रीडिंग घेण्याचे काम देण्यात आलेले असणे, परंतु सदरचे काम करीत असताना मे रुद्रा सिस्टीम नाशिक यानी कार्यादेशातील अटी शर्ती यांचे पालन न करता पेठ, ओझर, चांदवड, निफाड, लासलगाव उपविभागातील ग्राहकाचे रीडिंग न घेण्याचा एकतर्फी निर्णय कळवून महावितरण कंपनीचे महसुली उत्पन्न थाबविण्याचा प्रयत्न केला असणे, का.अ./नावी/महसूल गोप/५/७/१६०२.२०२२ अन्वये पेठ उपविभागातील कार्यादेश रद्द करण्यात आलेला असणे. नाशिक मंडळाबाहेरही मालेगाव मंडळ अंतर्गत मनमाड विभागात मे रुद्रा सिस्टीम LT ग्राहकांचे रीडिंग घेण्यास कार्यरत असणे, तेथे देखील मनमाड, नांदगाव, येवला शहर, येवला ग्रामीण उपविभागात कार्यादेशातील अटी शर्ती न पाळता रीडिंग न घेण्याचा एकतर्फी निर्णय कळवून महसुली उत्पन्न थांबविण्याच प्रयत्न केला असणे, पनवेल विभागातील उरण उपविभागात ही मे रुद्रा सिस्टीम PCO से CMRI से रीडिंग घेण्यास कार्यरत असणे, मात्र तेथेही PC-0 से रीडिंग घेण्यास असमर्थता दर्शविली असल्याने मे. रुद्रा सिस्टीम यांचा कार्यादेश रद्द करण्यात आला असणे, उरण उपविभागातील करारनाम्यातील रक्कम रुपये ४,७५,०००/- चे काम ही मे रुद्रा सिस्टीम यांनी पूर्णत्वास नेलेले नसणे, त्यामुळे मे रुद्रा सिस्टीम यांच्या कामासंदर्भात प्रश्न चिन्ह निर्माण होत असणे, का.अ./पनवेल/त/गोप५८ दिनांक २४.०२.२०२२ अन्वये NOTICE FOR TERMINATION OF CONTRACT देण्यात आली असणे, पालघर मंडळ अंतर्गत पालघर विभागातील विक्रमगड उपविभागात ही मे रुद्रा सिस्टीम LT RCI ग्राहकांचे रीडिंग घेण्यास कार्यरत असणे, मात्र विक्रमगड उपविभागात ही ग्राहकांचे रीडिंग घेण्यास दिनांक १९.०३.२०२२ च्या पत्रानाव्ये असमर्थता दर्शविल्याने त्यांचा कार्यदेश रद्द करण्यात आला असणे, वरील सर्व बाबी लक्षात घेता नाशिक मंडळाचा भौगोलिक परिसर खूप मोठा असणे, अंतर्गत २० उपविभाग असणे, तसेच PC-0 चे एकूण २०६२५ ग्राहक तसेच LT RCI चे ५,२२,५६० ग्राहक असणे, सर्व ग्राहकांचे मासिक रीडिंग / बिलिंग TIME BOUND वेळेत होणे अत्यावश्यक असणे, तसेच PCO ग्राहकांचे मासिक महसूली उत्पन्न देखील खूप मोठे आहे या सर्व आवश्यक बाबींचा विचार केला असता तसेच मे. रुद्रा सिस्टीम नाशिक यांचे कामासंदर्भातील REPUTATION पाहता तसेच दिलेले रीडिंग चे काम पूर्ण करू शकत नसणे, मुळे PC-0 तसेच LT RCI ग्राहकांचे रीडिंग घेणे बाबतीत भविष्यात गंभीर अडचण निर्माण होणे तसेच महावितरणचे

महसूल मोठ्या प्रमाणात बुडणे, परिणामी महाराष्ट्र राज्य महावितरण लि. अगोदरच आर्थिक अडचणीत असणे,मे.रुद्रा सिस्टीम नाशिक यांच्याकडून महावितरण लि. तसेच ग्राहकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होणे, तसेच मे. रुद्रा सिस्टीम नाशिक कडून भविष्यातही महावितरण व ग्राहकांचे प्रचंड आर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता दिसून येते असणे, तसेच वरिष्ठ व्यवस्थापक (प्रभारी), नाशिक मंडळ नाशिक यांनी दि.१५/१०/२०२२ च्या अहवालात मे रुद्रा सिस्टीम यांना पी.सी.रिडींग व LT RCI रिडींगसाठी निविदा ११/२०२२-२३ TENDER EVALUATION करीता अपात्र ठरविण्यात यावे. असा अहवालात मुख्य अभियंता महावितरण नाशिक यांना सादर करणे,सदरील अहवालाकडे मुख्य अभियंता महावितरण नाशिक यांनी जाणूनबुजून दुर्लक्ष्य करणे, तसेच सदरील मे.रुद्रा सिस्टीम च्या अत्यंत गंभीर स्वरूपाच्या कारभाराला मुख्य अभियंता महावितरण नाशिक यांच्याकडून मजबूत पाठबळ देणे, तसेच महावितरणाच्या निविदा नियमावलीतील १४ ब नुसार अटी व शर्ती भंग केलेले असणे, तसेच सदरील एजन्सीला नियम १५ नुसार पुढील पाच ते १० वर्ष महावितरणाच्या निविदा प्रक्रियेत भाग येत नसणे, सदरील एजन्सीवर गुन्हे दाखल करून तातडीने सदरील एजन्सीला काळ्या यादीत टाकण्यात यावे अशी तरतूद असणे, अद्याप पर्यंत मे.रुद्रा सिस्टीम नाशिक एजन्सीवर कोणतेही कारवाई करण्यात आलेली नसणे,लोकप्रतिनिधी, नागरिकयांनी वेळोवेळी मा.उर्जामंत्री, प्रधान सचिव उर्जा, अध्यक्ष व महा व्यवस्थापक महावितरण तसेच मुख्य अभियंता महावितरण नाशिक यांच्याकडे सदरील एजन्सीवर कारवाई करण्याबाबत लेखी मागणी करणे, मा. उर्जामंत्री तसेच मा. प्रधान सचिव उर्जा यांनी सदरील एजन्सी वर कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश देणे, अद्यापही मुख्य अभियंता महावितरण, नाशिक यांनी कोणतेही कारवाई न करता सदरील रुद्रा सिस्टीम नाशिकला TENDER EVALUATION पात्र ठरविणे, तसेच अद्याप कोणतेही कारवाई न केल्याने महावितरण व सरकारवर जनतेचा प्रचंड रोष निर्माण झालेला असणे, मे. रुद्रा सिस्टिम एजन्सी, नाशिक तसेच संबंधित एजन्सीला अप्रत्यक्ष पाठबळ देणारे महावितरण विभागाचे अधिकारी यांच्यावर तात्काळ कडक कारवाई करणे, मे.रुद्रा सिस्टीम नाशिक एजन्सीवर कडक कारवाई करून काळया यादीत टाकण्या बाबत नितांत आवश्यकता, याबाबत शासनाचे तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व उपाययोजना.""

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन.

महावितरणतर्फे नाशिक शहरात व जिल्हा अंतर्गत मे. रुद्रा सिस्टीम एजन्सी विभागीय स्तरावरील ई-निविदेद्वारे मोबाईल ॲपद्वारे वीज मीटर रिडींग व फोटो घेण्याचे तसेच वीज देयकाच्या वाटपाचे कामाकरीता नेमलेली आहे. सदर एजन्सी नाशिक मंडळांतर्गत २० उपविभागांपैकी ०९ उपविभागात व मालेगाव मंडळांतर्गत ०४ उपविभागाकरीता मोबाईल ॲपद्वारे वीज मीटर रिडींग व फोटो घेण्याचे तसेच वीज देयकाच्या वाटपाचे काम करीत आहे. सदर एजन्सी ही काही उपविभागात मागील १४ वर्षापासून काम करीत आहे.

मीटर रिडींग एजन्सीला निविदेच्या शर्ती व अटीनुसार ग्राहकांचे चुकीचे मीटर रिडींग आणणे, फोटो अस्पष्ट असणे किंवा फोटो चुकीचा असणे, रिडींग न घेणे व ग्राहकांना बिल वाटप न करणे

इत्यादीकरीता दंड आकारण्याची तरतूद आहे. मीटर वाचन करणाऱ्या कंत्राटदाराच्या कामातील त्रुटी अथवा कमतरता संगणकीय प्रणालीद्वारे देखरेख करुन मानवी हस्तक्षेपाशिवाय एकुण दंडाची रक्कम ठरवण्यात येते. निविदेच्या शर्तीप्रमाणे जास्तीत जास्त दंड हा मासिक बिलाच्या १० टक्के पर्यंत आकारण्यात येतो. राज्यात कार्यरत असणाऱ्या सर्व मीटर वाचन कंत्राटदारांना याच पध्दतीने दंड आकारण्यात येतो.

मे. रुद्रा सिस्टीम एजन्सी या कंत्राटदारास नाशिक जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या सर्व उपविभाग मिळून माहे डिसेंबर, २०२० ते नोव्हेंबर, २०२२ करिता निविदेच्या शर्ती व अटीनुसार रु.१.६६ कोटी एवढा दंड संगणकीय प्रणालीप्रमाणे मुल्यांकित करण्यात आलेला होता. त्यापैकी रु.१.०७ कोटी एवढा दंड एकट्या पेठ उपविभागातील कामाच्या त्रुटीबाबत मुल्यांकित (सप्टेंबर, २०२० ते फेब्रुवारी, २०२२ कालावधीकरीता) करण्यात आला होता. निविदेच्या शर्तीनुसार मे. रुद्रा सिस्टीम एजन्सीकडून माहे डिसेंबर, २०२० ते नोव्हेंबर, २०२२ पर्यंत रु. ३८.८ लाखाचा दंड वसुल करण्यात आलेला आहे.

नाशिक ग्रामीण विभागांतर्गत पेठ उपविभागात महावितरण कंपनीने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे वेळोवेळी आदेश व सुचना देवून देखील एजन्सीच्या कामकाजात सुधारणा न झाल्यामुळे कार्यकारी अभियंता, नाशिक ग्रामीण विभाग यांनी दि.१६.०२.२०२२ च्या पत्रान्वये सदर एजन्सीचे पेठ उपविभागाच्या कामाचा कार्यादेश रद्द करण्यात आलेला आहे. नाशिक ग्रामीण विभागाकडून निविदा करारापोटी भरणा करण्यात आलेली बँक गॅरंटी रु.१,२२,५८३/- सुध्दा (Forfeit) जप्त करण्यात आलेली आहे.

तसेच चांदवड विभागीय कार्यालयाने असमाधानकारक मीटर वाचनाच्या कामाबाबत चांदवड, लासलगाव, निफाड व पिंपळगाव उपविभागाकरीता व मनमाड विभागीय कार्यालयाने नांदगाव व येवला ग्रामीण उपविभागाकरीता सदर एजन्सीला ८ फेब्रुवारी, २०२२ मध्ये नोटीस देण्यात आलेली होती. त्यानंतर सदर उपविभागातील काम सुरळीत सुरु आहे.

नाशिक परिमंडळांतर्गत एकुण १४ उपविभागामध्ये मे.रुद्रा सिस्टिम नाशिक एजन्सीचे काम सुरु होते. त्यापैकी पेठ उपविभागामध्ये काम समाधानकारक नसल्याने सदरचा ठेका रद्द करण्यात आलेला आहे व उर्वरीत उपविभागामध्ये कार्यादेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम सुरु आहे. पेठ उपविभागामध्ये दुसऱ्या कंत्राटदाराची नेमणूक करुन पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

नाशिक मंडळ कार्यालय अंतर्गत मे. रुद्रा सिस्टिम यांना CMRI (Common Meter Reading Instrument) द्वारे मीटर वाचन करण्याचे काम देण्यात आलेले नाही. तसेच महावितरण कार्यालयाच्या- निविदा क्र. ११ नुसार मे. रुद्रा सिस्टिम क्र. नाशिक यांचेद्वारे निविदा प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यात आला होता. मात्र संबंधित एजन्सीने ज्या ज्या ठिकाणी CMRI रिडींगचे काम केले आहे. अशा ठिकाणची माहिती घेवुन एजन्सीचे काम असमाधानकारक असल्याने सदर एजन्सीला निविदा प्रक्रियेत अपात्र ठरविण्यात आले असुन, निविदा क्र. ११ ही रद्द करण्यात आलेली आहे.

एच-२७३ -२

पनवेल विभागातील, उरण उपविभागात CMRI (Common Meter Reading Instrument) च्या सहाय्याने ग्राहकांच्या मीटर वाचनाचे काम निविदा प्रक्रीयेप्रमाणे मे.रुद्र सिस्टीम यांना दि. २९.११.२०२१ च्या पत्रान्वये स्वीकृती देण्यात आले होते. सदर कामाची सुरुवात एजन्सीने जानेवारी, २०२२ मध्ये केली. माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये सदर एजन्सीचे काम समाधानकारक नसल्यामुळे शहर विभाग पनवेलद्वारे एजन्सीला कळविण्यात आले. परंतु, दि.०५.०२.२०२२ रोजी सदर एजन्सीने आर्थिकदृष्ट्या काम परवडत नसल्याचे कारण सांगून काम करण्यास असमर्थता दर्शविली. त्यानुसार पनवेल शहर विभागाकडून सदर एजन्सीला कार्यादेश रद्द करण्याबाबतची नोटिस दि.२४.०२.२०२२ रोजी देण्यात आली होती. त्यानंतर सदर कामाचा कार्यादेश दुसऱ्या कंत्राटदारास देण्यात आला आहे. माहे जानेवारी, २०२२ व फेब्रुवारी, २०२२ च्या कामाकरिता सदर एजन्सीला रु.१३,१००/- दंड म्हणून आलेला असून, सदर महिन्याकरिता त्याचा कामाचा मोबदला रु.३९, ४२६/- सुध्दा अदा करण्यात आलेला नाही.

कल्याण परिमंडळातंर्गत पालघर (सं. व सु.) मंडल कार्यालय असून पालघर विभाग आहे. पालघर विभागाअंतर्गत एकुण ९ उपविभाग आहेत. त्यापैकी विक्रमगड उपविभागात मोबाईल ॲपद्वारे फोटो व वीज मीटर वाचनाचे कंत्राट मे.रुद्रा सिस्टीम यांना दि.२०.११.२०२० ते दि.३०.०४.२०२२ पर्यंत देण्यात आले होते. मे. रुद्रा सिस्टीम यांचे काम असमाधानकारक आढळल्यामुळे विक्रमगड उपविभाग व पालघर विभाग कार्यालयाकडून मे.रुद्रा सिस्टीम यांना वेळोवेळी पत्रान्वये कळविण्यात आले. दि.१९.०३.२०२२ च्या पत्रान्वये मे.रुद्रा सिस्टीम यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविली व काम करण्यास नकार दिला. त्यानुसार मे.रुद्रा सिस्टीम यांचे विक्रमगड उपविभागातील वीज मीटर वाचनाचे काम बंद करण्यात आलेले आहे. मे.रुद्रा सिस्टीम यांना रु.१,११,१९०/- एवढा दंड आकारण्यात आला. तसेच जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.६३,५००/- जप्त करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

कंत्राटदारास उपविभागनिहाय निविदा प्रक्रियेद्वारे कार्यादेश देण्यात येत असल्याने, सदर कंत्राटदाराचे उपविभागनिहाय कामाचे मुल्यांकन करण्यात येते. ज्या ठिकाणी कामाचा दर्जा असमाधानकारक आढळला आहे, अशा ठिकाणीचे कार्यादेश रद्द करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे CMRI रिडींगसाठी नवीन निविदा प्रक्रियेत संबंधित कंत्राटदारास कोणताही आदेश नाशिक विभागात देण्यात आलेला नाही. याव्यतिरिक्त इतर उपविभागामध्ये सदर कंत्राटदाराच्या कामाचे मुल्यांकन करुन निविदेच्या शर्तीप्रमाणे दंड आकारण्यात आलेला आहे.

तसेच मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक यांनी परिमंडळ स्तरावर सदर प्रकरणात सखोल चौकशी करण्याकरिता चौकशी समिती गठीत केली. चौकशी समितीच्या अहवालानुसार मिटर रिडींग एजंन्सी मे.रुद्रा सिस्टीम, नाशिक यांना दि.२३.०३.२०२३ रोजी महावितरणच्या काळ्या यादीत ३ (तीन) वर्षाकरिता समाविष्ट करण्यात आलेले आहे.

************

एच-२७३ -२अ.

**गृह विभाग** **लक्षवेधी सूचना क्रमांक : २७**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री.चेतन तुपे, श्री.अजित पवार, श्री.जयंत पाटील, श्री.हसन मुश्रीफ, श्री.छगन भुजबळ, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.संजय जगताप, श्री.विक्रमसिंह सावंत, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.शिरीष चौधरी, श्री.अमिन पटेल, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनिल केदार, श्री.अस्लम शेख, श्री.धनंजय मुंडे, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.अबू आजमी, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना क्रमांक २७ पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे नोव्हेंबर/डिसेंबर २०२२ च्या दरम्यान महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील पुणे-बंगळूर महामार्गावरील कर्नाटक सीमेलगतच्या परिसरात बेळगाव आणि लगतच्या भागात महाराष्ट्रातील वाहनांची मोठ्या प्रमाणात झालेली मोडतोड, वाहनांना काळे फासणे, प्रवाश्यांना मारहाण करणे इ. घडलेल्या घटनांमुळे सीमावर्ती भागात निर्माण झालेलं तणावाचे वातावरण, नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची आणि प्रतिकाराची भावना, राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया निर्माण झाल्यामुळे वातावरण स्फोटक होऊन कायदा आणि सुव्यस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, नागरिकांमध्ये पसरलेली चीडीची व असंतोषाची भावना, तसेच ठिकठिकाणी निघालेले निषेध मोर्चे व आंदोलने, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाच्या अनुषंगाने माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२२ च्या दरम्यान कर्नाटक सीमेलगतच्या भागामध्ये महाराष्ट्रातील वाहनांची केलेली तोडफोड, वाहनांना काळे फासणे या घटनांमुळे राज्यात मोर्चे, आंदोलने, निषेध मोर्चे काढण्यात आले. या आंदोलने, मोर्चे यांच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना विभागामार्फत वेळीच करण्यात आल्या आहेत.

पोलीस आयुक्त, पुणे शहरांतर्गत अनेक कार्यकर्त्यांनी घोषणा करुन कर्नाटक सरकारच्या बसचे नुकसान केल्याने स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आला. तसेच पुणे- बेंगलोर महामार्गावर अनेक कार्यकर्त्यांनी घोषणेबाजी करुन कर्नाटक सरकारच्या बसेसचे नुकसान केल्यामुळे भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला. उपरोक्त दोन्ही गुन्हे हे तपासावर आहेत. तसेच, या कालावधीत कर्नाटक सीमेलगतच्या भागामध्ये तसेच, काही जिल्ह्यामध्ये कर्नाटक सरकारच्या बसेसचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

राज्यामध्ये असे कोणतेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस पेट्रोलिंग करुन योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दिनांक ०६.१२.२०२२ रोजीच्या बिनतारी संदेशाद्वारे सर्व घटक प्रमुखांना त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

---

रोटा/एच-३२१[७५०-६-२०२३].

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना**

**श्री. शांताराम मोरे, श्री. श्रीनिवास वनगा, श्री. विश्वनाथ भोईर वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३३० पुढीलप्रमाणे आहे :-**

"" मुंबईतील अनेक झोपडपट्टयांचे पुनर्वसन प्रकल्प हे मालकी हक्काच्या अनुषंगाने रखडलेले असणे, विशेषत: शासन नियंत्रित कल्याणकारी संस्था यांच्या मालकीच्या जमिनीवरील प्रकल्प राबविताना असंख्य अडचणी येत असणे, लोककल्याणकारी संस्थांना काही विशिष्ट उद्देशपूर्तीसाठी काही ठिकाणी खाजगी जमिन मालकांकडून दान स्वरुपात मिळालेल्या असणे, तर काही ठिकाणी शासनाकडून जमिनी वाटप केलेल्या असणे, या संस्थेचे संचालन/व्यवस्थापन हे काही लोकांच्या विश्वस्त समित्या, तर काहींच्या शासन नियुक्त प्रतिनिधी तर काही शासनाच्या विविध खात्यांमार्फत चालविले जाणे, या जमिनीवरील प्रकल्प राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमानुसार संबंधित जमिन धारकांकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावे लागणे, सदर संस्था अशा प्रकारे ना हरकत प्रमाणपत्र न देता उलटपक्षी कोर्टात जाऊन पुनर्वसनासाठी त्या प्रकल्पास विरोध करीत असल्याचे निदर्शनास येणे, कायद्यानुसार पात्र झोपडपट्टीधारकांना आहे त्याच ठिकाणी पुनर्वसित करण्याचे धोरण असताना असे प्रमाणपत्र प्राप्त करण्याची अट टाकून प्रकल्पांना विलंब करण्यासाठीचे कारण होत असणे, ज्याप्रमाणे, शासकीय, निमशासकीय जमिनींवर प्रकल्प राबविताना जमिनीच्या रेडीरेकनर दरनुसार येणाऱ्या किंमतींच्या २५ टक्के रक्कम प्रिमियम म्हणून घेण्याचे धोरण आहे. तसेच, अशा शासन नियंत्रित कल्याणकारी संस्था यांच्याकरीता लागू करण्याची आवश्यक असणे, जर पात्र झोपडपट्टीधारकांना कायद्यानुसार संरक्षण असल्याने अशा प्रकारे प्रिमियमची आकारणी करुन ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे अधिकार स्थानिक जिल्हाधिकारी अथवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देण्यास कोणतीही अडचण नसावी, तसेच प्रिमियमची आकारणी करण्यात येऊन ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती रद्द करणेबाबत निर्णय होणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

शासनाच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या संस्थेच्या मालकीच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ च्या विनिमय ३३(१०) नियम २.८ अन्वये जमीन मालक प्राधिकरणाची ना-हरकत प्राप्त करुन घेणे आवश्यक असते. त्यानुषंगाने योजनेस आशयपत्र निर्गमित केल्यानंतर जमीन मालक प्राधिकरणाची ना-हरकत प्राप्त होणेकरिता प्रस्ताव पाठविण्यात येतो. सदर प्रस्ताव पाठविल्यानंतर ६० दिवसांच्या आत ना-हरकत/ हरकत प्राप्त न

झाल्यास सदर नियमातील तरतुदीनुसार जमीन मालक प्राधिकरणाची ना-हरकत असल्याचे ग्राह्य (Deemed NOC) धरण्यात येऊन योजनेस पुढील परवानग्या देण्यात येतात.

शासकीय/निमशासकीय, तसेच स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी संबंधित गृहनिर्माण संस्था/विकासकाने आशयपत्र निर्गमित करावयाच्या वर्षाच्या रेडीरेकनर दरानुसार जमिनीच्या मुल्याच्या २५% एवढे जमीन अधिमूल्य भरणे आवश्यक आहे. सदरच्या अधिमुल्याची रक्कम संबंधित जमीन मालक प्राधिकरणास अदा करण्यात येईल, अशी तरतूद DCPR-2034 मध्ये करण्यात आली आहे.

शासन नियंत्रित म्हणजेच धर्मदाय आयुक्तांकडे किंवा सहकारी संस्था अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या संस्थांच्या त्यांच्या खाजगी जमिनीवर स्वत: अथवा त्यांच्यामार्फत नियुक्त विकासकामार्फत योजना राबविण्याचे प्राथमिक अधिकार हे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(१) नुसार जमीन मालकांना प्रदान करण्यात आले आहेत. अशा नोंदणीकृत संस्था त्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनीवर योजना राबवित असल्यास नियम २.८ अन्वये ना-हरकत प्राप्त करणे, तसेच २५% अधिमुल्याची रक्कम भरणा करणे आवश्यक नाही.

परंतु महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अन्वये खाजगी मालकीची झोपडपट्टी व्याप्त जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत झाल्यानंतर १२० दिवसांच्या आत जमीन मालकास योजना सादर करण्याची मुभा आहे. सदर १२० दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर झोपडपट्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १४(१) अन्वये भूसंपादन प्रस्ताव दाखल करण्याची मुभा आहे. अशा प्रकारे भूसंपादनाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १४(१) अन्वये भूसंपादनाची प्रक्रिया करण्यात येते.

संपादित करावयाच्या जमिनीकरिता जमीन मालकांना द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १७(२) (३) व (४) नुसार निश्चित करण्यात येते. सदर तरतुदीनुसार, जमीन मालकासोबत शासनाने अदा करावयाच्या रकमेबाबत कोणताही करार केला असल्यास त्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येते किंवा कलम १४ खालील नोटीसीच्या प्रसिध्दी दिनांकापासून मागील ५ वर्षातील, जमीन मालकास भाड्याच्या रकमेद्वारे, प्रत्यक्ष मिळालेल्या निव्वळ सरासरी उत्पन्नाच्या ६० पट इतकी नुकसान भरपाई रक्कम देण्यात येते.

***********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र: २९५**

**सर्वश्री. विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, बळवंत वानखेडे, राजु पारवे, सुरेश वरपुडकर, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२९५ पुढीलप्रमाणे आहे:-**

उस्मानाबाद जिल्हायातील रुई, ढोकी येथे ३९, रामवाडी येथे ३८, काजळा येथे ४७, नांदूर्गा येथे १९, जवळा दू येथे १६ ईला येथे ७१ हिंगळजवाडी येथे २७, घुगी येथे ८४, गावसुद येथे ६ अशाप्रकारे ३४१ मजूर बनावट दाखविणे, त्यांच्या मजूरीचे पैसे मिळण्यासाठी बीड जिल्यातील पाडळसिंगी येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत अज्ञाताच्या नावावर खाते उघडणे, या खात्यावर बनावट मजूरांचे तब्बल सव्वापाच लाख रुपयांपेक्षा अधिकची रक्कम जमा करण्यात येणे, उस्मानाबाद पंचायत समितीतील कंत्राटी सहायक कार्यक्रम अधिकारी विजय रामचंद्र कोळी रा. उस्मानाबाद यांच्यासह आई व भाऊ यांना रामवाडी येथील लाभार्थी लिंबराज पांडूरंग भोसले यांच्या घरकुलाच्या कामावर काम केल्यासंबंधीचा हजेरी पटातील रजिस्टरवर नाव असणे, एवढयावरच न थाबता त्यांचे नावे पैसेही काढण्यात आलेले असून, या गंभीर प्रकरणाची माहिती कोळी यांना समजताच त्यांनी याबाबतची तक्रार उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्याकडे करणे, हा सर्व घोटाळा संबधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संगनताने झाला असल्यामुळेच या गंभीर प्रकरणाची संथ गतीने होत असलेली चौकशी व यात सामिल असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणाम या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या माफतीने चौकशी करुन संबंधित दोषीवर कार्यवाही करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

---

**श्री. संदीपान भुमरे मा.मंत्री (रोहयो) यांचे निवेदन**

उस्मानाबाद जिल्हायातील पुढील ग्रामपंचायती अंतर्गत रुई, ढोकी येथे ३९, रामवाडी येथे ३८, काजळा येथे ४७, नांदूर्गा येथे १९, जवळा दू येथे १६ ईला येथे ७१ हिंगळजवाडी येथे २७, घुगी येथे ८४, गावसुद येथे ६ अशाप्रकारे ३४१ बनावट मजूर दाखवून बनावट हजेरीपत्रके तयार करून त्या आधारे प्रत्यक्ष काम केले नसतांना वेजलिस्टमध्ये बीड जिल्हयातील खातेधारकांच्या खातेक्रमांकावर सुमारे रु.५,१०,५३४/- अकुशल भागाची अदायगी झाल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आला तसेच प्रकरणी श्री.विजय रामचंद्र कोळी हे सहायक कार्यक्रम अधिकारी पंचायत समिती, उस्मानाबाद येथे कार्यरत असताना त्यांना वैयक्तिक घरकुलाच्या कामावर हजर दाखवून त्याचे नावे, आई व त्यांच्या भावाच्या नावे हजेरी पत्रक निर्गमित झाल्याचे लक्षात आले त्यांनी सदर बाब

गटविकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणली आणि उपजिल्हाधिकारी रोहयो, उस्मानाबाद यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला. त्यानुसार प्रकरणी चौकशी करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले.

त्यानुषंगाने चौकशी करण्यात आली असून प्रकरणी अनियमितता/अपहार झाल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे त्याबाबतचे गांभीर्य विचारात घेवून जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सदर प्रकरणातील जबाबदार कंत्राटी कर्मचारी श्री.विश्वनाथ राऊत यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिले. श्री.विश्वनाथ राऊत यांच्या कंत्राटी सेवा कायमस्वरुपी समाप्त करण्यात आलेल्या आहेत. तसेच सहाय्यक लेखाधिकारी श्री.आर.जे.लोंध हे सध्या निलंबित असून त्यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे. सदर प्रकरणी विश्वनाथ राऊत यांच्यावर आनंद नगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद येथे दि.०३/१२/२०२२ रोजी भा.द.वि १८६० च्या कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७०,४७१ व ४७७ (A) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणात पोलीस चौकशी चालू आहे. त्यामुळे प्रकरणात विलंब झालेला नाही.

************